# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे
तात्काळ

क्रमांक : १६/आस्था/निधी वितरण/२०१९/२८७
दिनांक : २०।९।२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती.

विषय :- सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता वृक्ष लागवड संगोपनासाठी निधी वितरीत करण्याबाबत.
संदर्भ :- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८१/आस्था-२, दिनांक ६.९.२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या वर्षासाठी वृक्ष लागवड आणि संगोपन या उद्दिष्टासाठी आवश्यक ठरलेल्या मजूरी आणि पूरवठा व सामग्री याकरिता निधी उपलब्ध झालेला आहे.

सदर प्रकरणी या संचालनालयास सन २०१९-२० मध्ये ठरवून दिलेल्या ३,५३,००० एवढया वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने वेळोवेळी संस्था स्तरावरून लागवडीबाबतची अद्ययावत माहिती शासनास संगणक प्रणालीच्या माध्यमातून पाठविण्यात येत आहे. याबाबतची संस्थानिहाय प्रत्यक्ष वृक्षलागवडीची माहिती तसेच यापूर्वी लावलेल्या रोपांपैकी सुस्थितीत जीवंत असलेल्या रोपांचा आढावा घेवून त्या अनुषंगाने संबंधितांना निधी वितरीत करावयाचा आहे.

तरी, सदर प्रकरणी खालील प्रपत्रात आपल्या विभागांतर्गत लागवड केलेल्या वृक्षांबाबतची, संस्थांस्तरावरून संगणक प्रणालीवर प्रत्यक्ष अद्ययावत केलेली, संस्थानिहाय माहिती दिनांक ३०.९.२०१९ पर्यंत या संचालनालयास उपलब्ध करून देण्यात यावी जेणेकरून शासनाने वितरित केलेला निधी संबंधितांना विहित मुदतीत प्रदान करणे नियंत्रक अधिकारी या जबाबदारीतून संचालक, तंत्रशिक्षण हे करू शकतील.

प्रपत्र

| अ.क्र. | संस्थेचे नांव | सन २०१९ मध्ये दिलेले उद्दिष्ट | सन २०१९ मध्ये प्रत्यक्ष लागवड केलेले वृक्षांची संख्या | मागील वर्षी लावलेल्या रोपांपैकी जीवंत रोपांची संख्या | या कामी आवश्यक असलेला निधी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मजूरी | पूरवठा व सामग्री |

तरी, सदर प्रकरणी प्रथम प्राधान्याने आवश्यक ती कार्यवाही करून उपरोक्त माहिती दिलेल्या मुदतीत सादर करणे आपली जबाबदारी राहील.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठ क्र. तंशिसं/विकाना/शैवि/वृक्षलागवड/2019/ 2934
दिनांक 24 SEP 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय तंत्रनिकेतन, अनुदानित व खाजगी विना अनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था , नागपूर विभाग, नागपूर .

आपणांस कळविण्यांत येते की, सन 2019-20 या वर्षासाठी वृक्षलागवड कार्यक्रमांकरिता सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे दिलेल्या प्रपत्रात योग्य ती माहिती दि. 29/09/2019 पर्यंत नचुकता पाठवावी. जेणे करुन वेळेमुदतीत सदर माहिती पाठविणे शक्य होईल.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.